**प्रेसनोट** **दिनांक २४/०८/२०१९**

## कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर

### वाहतुकीचे नियम पाळणेबाबत विदयार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी याबाबत मार्गदर्शन

आज दिनांक २४/०८/२०१९ रोजी ११.०० वाजता मा पंकज देशमुख पोलीस उपआयुक्त वाहतुक शाखा वपोनि अनिल पाटील कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर वपोनि विष्णु पवार सपोनि चेतन मोरे कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर यांचे उपस्थितीत विदयार्थ्यांमध्ये वाहतुकीचे नियम पाळणेबाबत जनजागृती व्हावी याकरीता सभा रामभाऊ म्हाळगी शाळा राजस सोसायटी कात्रज पुणे येथे आयोजित करण्यात आली असुन सदर कार्यक्रमांस वर दर्शविलेले मान्यवर तसेच शाळेचे मुख्याध्यापक,शाळेतील शिक्षक वर्ग तसेच अंदाजे १२० ते १४०विदयार्थी हजर होते कार्यक्रमांचे सुत्र संचालन वपोनि पाटील यांनी केले असुन पुढे मा.पंकज देशमुख पोलीस उपआयुक्त वाहतुक शाखा यानी विदयार्थ्याना वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत योग्य त्या सुचना दिल्या व मार्गदर्शन केले व वाहतुकीचे नियम पाळल्याचे फायदे समजावले सदर बाबत वपोनि विष्णु पवार भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे शहर यांनी देखील विदयार्थ्याना प्रबोंधनात्मक भाषण केले तदनंतर सर्व उपस्थितांचे व विदयार्थ्याचे उपस्थितीबाबत मा.मुख्याध्यापक यांनी आभार प्रदर्शनात्मक भाषण करुन वरील मान्यवरांचे शाल व श्रीफळ देवुन गौरविण्यात आले




एकता मित्र मंडळ ट्रस्ट, कात्रज
रस्ता मोकळा
तरीही राजा
हॉर्न वाजवतोस